पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे–४११००७

संदर्भ:– एक्स टी/बी.बी.ए./बी.सी.ए./बी.एफ.टी./५७०८ दिनांक:– १९/०९/२०११

प्रति,
मा.प्राचार्य,
बी.बी.ए./बी.सी.ए./बी.एफ.टी./बी.बी.एम. (आय.बी.) महाविद्यालये,

**विषय:–** ऑक्टोबर/नोव्हेंबर २०११ मध्ये होणा–या बी.बी.ए./बी.सी.ए./बी.एफ.टी./ बी.बी.एम. (आय.बी.) परीक्षेची नेमलिस्ट, परीक्षा प्रवेश पत्र व समरी बाबत...

...

महोदय/महोदया,

ऑक्टोंबर/नोव्हेंबर २०११ मध्ये होणा–या बी.बी.ए./बी.सी.ए./बी.एफ.टी./बी.बी.एम. (आय.बी.) परीक्षेसाठी आपल्या महाविालयामार्फत जे विद्यार्थी बसलेले आहेत त्या विद्यार्थ्यांच्या नावांची यादी, परीक्षा प्रवेश पत्रे व समरी पाठविण्याची खालीलप्रमाणे व्यवस्था करण्यात येत आहे. प्रवेश पत्रे, विद्यार्थ्यांची विषयावार माहिती बरोबर असल्याची कृपया खात्री करून घ्यावी.

१.नाशिक जिल्हयातील सर्व महाविद्यालयांचे वरील साहित्य विद्यापीठाच्या नाशिक येथील उपकेंद्रावर पाठवित आहोत.(विद्यापीठ विभागीय कार्यालय, नाशिक पोलिस आयुक्त कार्यालयासमोर एच.डी.एफ. सी.हाऊस जवळ, महानगरपालिका मार्केट इमारत, तिसरा मजला नाशिक–२) आपल्या महाविद्यालयाचा प्रतिनिधी दि. २०/०९/२०११ रोजी दुपारी १.०० ते ४.०० या वेळेत पाठवून सदरचे साहित्य या उपकेंद्रावरून घेवून जाण्याची व्यवस्था करावी.

२. अहमदनगर जिल्हयातील सर्व महाविद्यालयांचे वरील साहित्य विद्यापीठाच्या अहमदनगर येथील उपकेंद्रावर पाठवीत आहोत. (विद्यापीठ विभागीय कार्यालय, न्यू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर) आपल्या महाविद्यालयाचा प्रतिनिधी दि. २०/०९/२०११ रोजी दुपारी १.०० ते ४.०० या वेळेत पाठवून सदरचे साहित्य या उपकेंद्रावरून घेवून जाण्याची व्यवस्था करावी.

३. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील सर्व महाविद्यालयांनी वरील साहित्य विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या बी.कॉम. कक्षातून दिनांक २०/०९/२०११ रोजी सकाळी ११.०० ते ४.००.या वेळेत महाविद्यालयाचा प्रतिनिधी पाठवून सदरचे साहित्य घेवून जाण्याची व्यवस्था करावी.

कळावे,

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी:–

१. केंद्र प्रमुख, विद्यापीठ उपकेंद्रे, नाशिक व अहमदगनर.
सदरचे साहित्य संबंधित महाविद्यालयांना वेळेत उपलब्ध करून द्यावे.